साप्ताहिक

# निर्भीड वर्तमान

संपादक : अश्विनी श्रीकांत दारोळे,

मो. नं. : 9637777003

■ RNI TC MAHMAR52916

■ DECL NO.SDM/SR/74/2023 Dt. 15/12/2023

■ Web : https://nirbhidvartamaan.com

■ वर्ष १ ले ■ अंक ७ ■ पुणे, शुक्रवार, दि. १ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२४ ■ मुल्य : २ रु ■ पाने ४

## सरकारने पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना कराव्यात - स्वाभीमानी मराठी पत्रकार संघाची मागणी

**निर्भीड वर्तमान:–** जबाबदारी पार न पाडण्याबाबत वार्तांकन केल्याचा राग मनात धरून पत्रकारास धमकी देऊन धक्काबुक्की करत वार्तांकनास अडथळा निर्माण केलेप्रकरणी एकावर गेंीपरश्रळीीं झीेंशलींळेप –लीं;पत्रकार संरक्षण कायदयांतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. किरण माने, प्रोजेक्ट मॅनेजर, स्वयम शिक्षण प्रयोग रा. धाराशिव असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. हा सर्व प्रकार बार्शी येथे घडला आहे.

**काय आहे संपूर्ण प्रकरण;**

या प्रकरणातील तक्रारदार पत्रकार धिरज आगतराव शेळके हे बार्शी तालुक्यातील असुन गेले पाच वर्षांपासून पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातिल प्रश्न जगासमोर मांडत आहेत. त्यांचा कामाचा एक भाग म्हणून दि. ०५/०१/२०२४ रोजी बार्शी येथे कार्यरत असलेल्या उमेद अभियाना अंतर्गत काम करणारे महीलांचे मानधन न मिळाल्याने त्या महीला पंचायत समिती बार्शी या ठिकाणी उपोषण करण्याकरिता बसल्या होत्या. या उपोशणाबाबतची हिंदवी समाचार न्युज चॅनेलने बातमी प्रसारित केली होती. तर उपोषणाची बातमी पाहुन बीडीओ पंचायत समिती बार्शी यांनी तात्काळ तोंडी आश्वासन दिले होते की, संबधित संस्थेच्या अधिकारी यांना बोलावुन विषय मार्गी लावतो.

पुढे दि. १७/०१/२०२४ रोजी संबधित स्वयंम शिक्षण प्रयोग याचे प्रोजेक्ट मॅनेंजर किरण माने यांना व उमेद अभियान मध्ये काम करणारे मानधन न मिळालेले महीलाना चर्चा करण्यासाठी उमेद अभियानाचे शिवाजी आखाडा बार्शी येथील बीएसएनएस चे बिल्डींग मधील आफिस मध्ये दुपारी बोलावुन घेतले होते. या मीटिंगच्या ठिकाणी पत्रकार वार्तांकन करून महीलांची व प्रोजेक्ट मॅनेंजर यांची प्रतिक्रिया घेत असताना स्वयंम शिक्षण प्रयोग धाराशिव संस्थेचे प्रोजेक्ट मॅनेंजर किरण माने यांना पत्रकार यांनी उपोशणकत्त्या महीलांचे मानधन काढले का नाही व काढले असेल तर ते कोणत्या आधारावर काढले याबाबत विचारणा केली त्यावर माने यांनी मला भुक लागली आहे मला जेवायला जायचे आहे.असे उत्तर देऊन विषय टाळण्याचा ते प्रयत्न करत होते यामुळे प्रोजेक्ट मॅनेंजर यांना हया महीला पण सकाळपासुन येथे उपाषी बसलेल्या आहेत त्यांना पण जेवायला जायचे आहे असे सांगितले असता प्रोजेक्ट मॅनेंजर यांचा भलताच पारा वर गेला व त्यांनी शुटिंग काढत असलेला मोबाईल हिसकावुन घेण्याचा प्रयत्न करून धक्काबुक्की व शिवीगाळी करून तुला कुठे गुन्हा दाखल करायचे आहे ते कर तुला बघुन घेईन असे म्हणुन धमकी देवुन ते तेथून निघुन गेले होते.



स्वाभीमानी मराठी पत्रकार संघ पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्रीकांत दारोळे यांनी पत्रकार धिरज शेळके यांच्या सोबत दूरध्वनीद्वारे संवाद साधला असून प्रकरणाची माहिती घेतली आहे व पत्रकार संघ शेळके यांच्या सोबत असून भविषयात पत्रकारिता करत असताना व दाखल केलेल्या गुन्ह्या मध्ये कोणताही प्रकारची दिरंगाई किंवा दबाव येत असेल तर स्वाभीमानी मराठी पत्रकार संघ शांत बसणार नाही असे आश्वासित केले आहे. तर बार्शी पोलिस स्टेशन यांच्याशीही याप्रकरांची चर्चा केली आहे.

पत्रकारांवर वाढत असलेले हल्ले हे पत्रकारांसोबत समजासाठीही तेवढेच घातक आहे. पत्रकारांना आपले काम करण्यासाठी मोकळे वातावरणाचा अभाव झाल्याचे चित्र बघावयास मिळत आहे हे कधीही सहन केले जाणार नाहीत असे मत दारोळे यांनी व्यक्त केले आहे.

नेहमी शांत असलेला व २४ तास समाजाप्रति आपल्या नैतीक जबाबदारीचे भान ठेऊन आपले योगदान पत्रकार देत असतो पत्रकार हा समाजाचा आरसा असून व चौथा आधारस्तंभ असतो त्याला जर आपल्या कामामध्ये दबाव किंवा गुंडशाहीचे प्रकार वाढत असतील ही बाब पत्रकारांसोबत आपल्या समाजसाठी घातक आहे.

२०१७ साली अस्तित्वात आलेल्या गेंीपरश्रळीीं झीेंशलींळेप –लीं पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत दाखल झालेला सोलापूर जिल्ह्यातील हा पहिलाच गुन्हा आहे अशा सर्व प्रकाराला वेळीच आळा घालण्यासाठी नुसते कागदावर नाही तर पत्रकार संरक्षण कायद्याच्या कठोर अंमलबजावणीची गरज निर्माण झाली आहे. पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत, पत्रकारांना त्यांच्या पत्रकारितेच्या कामात अडथळा आणणाऱ्या किंवा त्यांना धमकी देणाऱ्या, हल्ले करणाऱ्या व्यक्तींना शिक्षा होऊ शकते. या कायद्याचा वापर करून पत्रकारांवर होणाऱ्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी हा एक महत्त्वाचा निर्णय आहे. सरकारने या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणीही पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्रीकांत दारोळे यांनी या निम्मीताने पुनः केली आहे

## विधिसंघर्षित बालक ताब्यात घेऊन ०३ मोबाईल केले जप्त बंडगार्डन पोलीस स्टेशनची कामगिरी

**निर्भीड वर्तमान:–** मोटरसायकल वरुण रस्त्यावर चालणाऱ्या लोकांचे मोबाईल चोरणाऱ्या चोरला बंडगार्डन पोलीस स्टेशनच्या पथकाने ताब्यात घेतला आहे.

बंडगार्डन पोलीस स्टेशन हद्दीमध्ये तपास पथकातील अधिकारी पो. उप.निरी रविन्द्र गावडे व कर्मचारी पो. ना. सरवदे, पवार हे पेट्रोलिंग करत असताना पो.शि.ज्ञाना बडे व मनोज भोकरे यांना आपल्या गोपनीय बातमीदाराच्या मार्फत माहिती मिळाली कि, चोरी करून मोबाईल विकन्यासाठी एकजन पाचबिल्डिंग ताडीवाला या ठिकाणी येणार आहे. मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी पोलिसांनी सापळा रचून एका विधीसंघर्षित मुलाला ताब्यात घेऊन त्याच्या जवळ असलेल्या मोबाईलची विचारपूस केली तर त्याने ते मोबाईल फोन मोटरसायकल वरून खेचून चोरी केल्याचे कबूल केले आहे. त्यानुसार बंडगार्डन पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद करून या गुन्हया व्यतिरिक्त अजून २ मोबाईल जप्त करण्यात आलेले आहेत. त्याबाबत अधिकचा तपास सुरू आहे. सदरची कारवाई अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम विभाग पुणे शहर प्रवीणकुमार पाटील साहेब, पोलीस उपायुक्त परिमंडळ २ स्मार्तना पाटील मॅडम, साहाय्यक पोलीस आयुक्त लष्कर विभाग संजय सुर्वे सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बंडगार्डन संदीपान पवार , पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रशांत भस्मे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोलीस उपनिरीक्षक रवींद्र गावडे, पो. हवा सुधीर घोटकुले, अनिल कुसाळकर, पो.शि ज्ञाना बडे, संजय वणवे, शिवाजी सरक, मनोज भोकरे यांचे पथकाने सदरची कारवाई केली आहे.




## दुबईहून सोन्याची तस्करी; पुणे विमानतळावर दोघांना अटक

**पुणे :** दुबईहून तस्करी करून आणलेले सहा किलो ९१२ ग्रॅम सोने महसूल गुप्तचर संचलनालयाने (डीआरआय) पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर जप्त केले. सोने तस्करी प्रकरणात एका महिलेसह दोघांना अटक करण्यात आली. पुणे आंतराष्ट्रीय विमानतळावर दुबईहून सोन्याची तस्करी करून एक महिला येणार असल्याची माहिती 'डीआरआय'च्या (डिरेक्टोरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स) पथकाला मिळाली. त्यानंतर पथकाने विमानतळावर सापळा लावला. विमानतळावर महिला साथीदारासह उतरली. डीआरआयच्या पथकाने दोघांची संशयावरुन चौकशी सुरू केली.

## राज्यात सर्वत्र हुडहुडी; पारा दहा अंशांच्या खाली; पुण्यात सर्वांत कमी तापमान

**पुणे :** उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा जोर वाढल्यामुळे राज्यात किमान तापमानात घट झाली आहे. राज्याच्या बहुतेक भागात कमाल आणि किमान तापमानात घट झालेली दिसून येत आहे. किमान तापमान दहा अंश सेल्सिअसच्या खाली गेले आहे. दिवसाही गार, बोचरे वारे वाहत असल्यामुळे राज्यभरात थंडी जाणवत असून, आबालवृद्धांना हुडहुडी भरली आहे. दिवसभरात सर्वांत कमी ८.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद पुण्यात झाली.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेचा जोर वाढला आहे, तसेच बंगालच्या उपसागरावरून आग्नेय दिशेने येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांचा जोर कमी झाल्यामुळे मागील दोन दिवसांपासून कमाल आणि किमान तापमानात वेगाने घट झाली आहे. किमान तापमान १० अंश सेल्सिअसच्या खाली आले आहे. कमाल तापमानातही सरासरी एक ते दोन अंश सेल्सिअसने घट झाली आहे. दुपारी तासभर उन्ह पडल्यानंतर लगेच पुन्हा थंड, बोचरे वाहत आहे. त्यामुळे दिवसभरही हवेत गारठा जाणवत आहे. शहरी आणि ग्रामीण भागातही थंडीचा सामना करावा लागत आहे.

निर्भीड वर्तमान

वाढदिवस शुभेच्छा जाहीरात, नोटीस व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीसाठी

संपर्क

९६३७७७७००३

निर्भीड वर्तमान

■ वर्ष १ ले ■ अंक ७ ■ पुणे, शुक्रवार, दि. १ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२४



## संपादकीय

# पलटूरामांची पलटी !

बिहारच्या व देशाच्या राजकारणात सतत उलट-सुलट भूमिका घेऊन कायम सत्तेत राहण्याचे कौशल्य प्राप्त केल्याने 'पलटूराम' अशीच ओळख असलेल्या नितीश कुमार यांनी पुन्हा एकवार पलटी मारत भाजपशी हातमिळवणी केल्याने बिहारमध्ये पुनश्च भाजप विरोधी बाकावरून सत्ताधारी बाकावर आला आहे. नितीश कुमार यांनी तीन वर्षांत दुस-यांदा पलटी मारली आहे. रविवारी सकाळी महाआघाडी सरकारचा मुख्यमंत्री म्हणून राजीनामा दिल्यावर सायंकाळी लगेच रालोआ सरकारचा मुख्यमंत्री म्हणून शपथ ग्रहण करण्याचा पराक्रमही नितीश कुमार यांनी केला आहे. अवघ्या १८ महिन्यांपूर्वी भाजपची साथ सोडून नितीश कुमार यांनी राजद व काँग्रेसचा हात धरला होता व आता भाजपसोबत कधीच जाणार नाही अशी भीमगर्जना केली होती. एवढेच नाही तर भाजपच्या विरोधात विरोधकांची एकत्रित आघाडी उभारण्यासाठी त्यांनी पुढाकारही घेतला होता. त्यातून विरोधी पक्षांची 'इंडिया' आघाडी अस्तित्वातही आली. भाजपनेही नितीश कुमारांसाठी दारे बंद केल्याची गर्जना केली होती. मात्र, आता अवघ्या १८ महिन्यांत पलटूराम नितीश कुमार भाजपला शरण गेले आणि भाजपनेही त्यांच्यासाठी आपले बंद केलेले दार उघडले! त्यामुळे आता केवळ नितीश कुमारच नाही तर 'पार्टी विथ डिफरन्स' म्हणून मिरविणारा भाजपही पलटूरामच्या रांगेत जाऊन बसला आहे.

नितीश कुमार व भाजप यांचा पलटी मारण्याचा इतिहास हा भारतीय राजकारणातील 'सत्तेसाठी वाट्टेल ते'चे उत्तम उदाहरणच ठरावे! जनता दलातून फुटून नितीश कुमार यांनी १९९४ मध्ये समता पार्टीची स्थापना केली व १९९५ च्या निवडणुकीत डाव्या पक्षांशी युती केली. मात्र, ते निवडणुकीत पराभूत झाले! पराभवानंतर त्यांनी डाव्या पक्षांशी काडीमोड घेत भाजपप्रणीत रालोआशी घरोबा केला. २०१३ पर्यंत म्हणजे १७ वर्षे ते भाजपसोबत होते. मात्र, २०१४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून भाजपने नरेंद्र मोदी यांना निवडल्यावर नितीश कुमार यांचा राजकीय भ्रमनिरास झाला व त्यांनी रालोआसोबतचा आपला १७ वर्षांचा घरोबा तोडला. ते स्वबळावर लढले मात्र त्यांना फक्त दोन जागांवर विजय प्राप्त करता आला. त्यामुळे त्यांनी २०१५ मध्ये विधानसभा निवडणुकीसाठी राजद व काँग्रेसशी युती केली. भाजपचा पराभव झाला व महाआघाडीचे सरकार स्थापन होऊन नितीश कुमार मुख्यमंत्री बनले. मात्र, २०१७ मध्ये तेजस्वी यादव यांचे आयआरसीटीसी घोटाळ्यात नाव आल्याचे कारण पुढे करून त्यांनी पुन्हा भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला.

२०२० च्या विधानसभा निवडणुकीत नितीश कुमार यांच्या जेडीयूला ४३ तर भाजपला ७४ जागा मिळाल्या. भाजपने चिराग पासवान यांचा व्यवस्थित वापर करत नितीश कुमार यांच्या जेडीयूचे संख्याबळ कमी केले. मात्र, तरीही नितीश कुमार यांना मुख्यमंत्रिपद दिले. तथापि, सरकारमध्ये भाजपचा वरचष्मा राहील याची भाजपने पूर्ण व्यवस्था केली. अगोदरच निवडणुकीत भाजपने केलेल्या खच्चीकरणाने दुखावलेल्या नितीश कुमार यांना सरकारमधील कुचंबणा सहन न होणारीच होती. त्यामुळे भाजपला धडा शिकवण्यासाठी नितीश कुमार यांनी राजद व काँग्रेसशी आघाडी करण्याचा निर्णय २०२२ मध्ये घेतला व ते मुख्यमंत्री म्हणून कायम राहिले. त्यांनी भाजपला राष्ट्रीय पातळीवरही धडा शिकवण्याचा संकल्प सोडला व विरोधी पक्षांच्या ऐक्यासाठी पुढाकार घेतला. त्यातून इंडिया आघाडी जन्मालाही आली. मात्र, इंडिया आघाडीच्या बंगळुरू येथील बैठकीनंतर नितीश कुमार नाराज झाले. त्यांचा पुन्हा राजकीय भ्रमनिरास झाला कारण इंडिया आघाडीचे नेतृत्व काँग्रेसकडे गेले.

शिवाय या बैठकीत जागावाटपाचा मुद्दाही मार्गी लागला नाही. त्यात बिहारचे मुख्यमंत्रिपद तेजस्वी यादव यांच्याकडे सोपविण्याचा आग्रह लालू यादव यांनी धरला होता. लालूंच्या या प्रस्तावाने नितीश कुमार पुरते बिथरले व त्यांनी पुन्हा रालोआसोबत जाण्याचा निर्णय घेतला. भाजपलाही हेच हवे होते कारण संख्याबळाच्या दृष्टीने जास्त मदार असलेल्या बिहार राज्यात भाजपला जेडीयू-राजद-काँग्रेस या तीन पक्षांच्या आघाडीचा सामना करणे अवघडच बनले होते. त्यामुळे या आघाडीत फूट पडावी यासाठी भाजप प्रयत्नरत होताच. नितीश कुमार यांनाही आपले मुख्यमंत्रिपद काहीही करून वाचवायचे होते. त्यामुळे दोघांनीही आपल्या भीमगर्जना १८ महिन्यांतच बासनात गुंडाळून पुन्हा एकमेकांचा हात हाती धरला आहे. भाजपने बिहारमध्ये नितीश यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेऊन एका दगडात दोन पक्षी मारले आहेत. इंडिया आघाडीच्या ऐक्याला खिंडार पाडणे ही भाजपची या घडीची सर्वांत मोठी राजकीय गरज होती.

त्यातच ज्या राज्यात भाजपला संख्याबळ वाढविण्याची आशा आहे तिथे इंडिया आघाडी कमकुवत होणे भाजपसाठी गरजेचे होते. पलटूराम नितीश कुमार यांनी आपल्या सत्ताग्रहासाठी भाजपची ही गरज पूर्ण करून दिली आहे. त्यामुळे भाजपने त्यांना मुख्यमंत्रिपद विनाअट बहाल करण्यात काहीच आश्चर्य नाही. मात्र, मंत्रिमंडळात व सरकारमध्ये भाजपच वरचढ राहील याची पूर्ण दक्षता घेतली जाईलच! लोकसभा निवडणुकीत भाजपने पुन्हा स्वबळावर सरकार स्थापन करण्याचे संख्याबळ प्राप्त केले तर मात्र बिहारमध्ये पुन्हा राजकीय उलथापालथ होऊ शकते. कदाचित त्यावेळी महाराष्ट्रात वापरलेला पक्षच हायजॅक करून सत्ता मिळविण्याचा फॉर्म्युला नितीश कुमार यांच्या जेडीयूबाबत वापरला जाऊ शकतो. कारण नितीश व भाजप यांचा आताचा घरोबा परस्पर विश्वासाने वा मनोमिलनामुळे झालेला नाही तर निव्वळ गरजेपोटी झालेला आहे. आणि 'गरज सरो वैद्य मरो' हा मंत्र वापरण्यात नितीश व भाजप हे दोघेही अत्यंत तरबेज आहेतच! त्यामुळे या घडीला लोकसभा निवडणुकीच्या निकालापर्यंत नितीश कुमार यांचे मुख्यमंत्रिपद कायम आहे,

हे नक्की! या सगळ्यात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या इंडिया आघाडीला धक्का देण्यात भाजप यशस्वी झाला आहे. बंगालमध्ये ममता बॅनर्जी व पंजाबमध्ये 'आप'चे मान यांनी काँग्रेसशी जागावाटपास दिलेल्या नकारानंतर इंडिया आघाडीत निर्माण झालेली अस्वस्थता दूर करण्याचा प्रयत्न काँग्रेस करत असताना नितीश कुमार यांनी आपल्या सत्ताग्रहासाठी स्वत:च पुढाकार घेऊन उभारलेल्या इंडिया आघाडीला धक्का दिला आहे. राजद व काँग्रेसला यातून सावरण्यासाठी आता प्रचंड वेगाने व ताकदीने प्रयत्न करावे लागतील. तूर्त मागची १७ वर्षे बिहारच्या मुख्यमंत्रिपदी कायम राहण्याचे कौशल्य दाखविणारे पलटूराम नितीश आता नवव्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणारे देशातले पहिले मुख्यमंत्री ठरले आहेत. त्यांच्या या विक्रमाचे श्रेय त्यांच्या पलटी मारण्याच्या कौशल्यास द्यावे लागेल, हे मात्र निश्चित!

# सन्मानाचे 'टायमिंग'!

मागासवर्गीयांना त्यांच्या हक्काचे प्रतिनिधित्व व संधी मिळाव्यात यासाठी आयुष्यभर संघर्षरत राहिलेल्या जननायक कर्पुरी ठाकूर यांना त्यांच्या जन्मशताब्दीच्या सांगतेचे निमित्त साधत केंद्र सरकारने मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान जाहीर केला आहे. कर्पुरी ठाकूर यांचे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान लक्षात घेता त्यांना जाहीर करण्यात आलेल्या या सन्मानाचे स्वागतच! मात्र, तो जाहीर करताना चाणाक्ष सरकारने जे 'टायमिंग' साधले आहे त्यावर सरकारच्या या हेतूत राजकीय स्वार्थाचीही शंका आल्याशिवाय रहात नाही. त्याची चर्चा होणे अपरिहार्यच! प्रथम कर्पुरी ठाकूर यांच्या योगदानाविषयी- आजही मागास वा बिमारू राज्य ही ओळख पुरती पुसू न शकलेल्या बिहारमध्ये बरोबर शंभर वर्षांपूर्वी कर्पुरी ठाकूर यांचा एका नाभिक कुटुंबात जन्म झाला. मागास प्रांतातील मागास समाजाच्या व्यथा, वेदना अनुभवत ते मोठे झाले. या समाजाने प्रगतीची कास धरावी यासाठी प्रस्थापितविरोधी राजकारणाच्या म्हणजेच बिगर काँग्रेसवादाच्या प्रवाहात कर्पुरी ठाकूर यांनी देशाच्या स्वातंत्र्यानंतर उडी घेतली.

तत्पूर्वी त्यांनी कॉलेजच्या शिक्षणाला रामराम ठोकून स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. 'भारत छोडो' चळवळीच्या आंदोलनादरम्यान त्यांना अटक झाली. त्यांनी जवळपास ३ वर्षे तुरुंगवास भोगला. स्वातंत्र्यानंतर आपल्याच खेड्यात शाळेत शिक्षक म्हणून काम करताना त्यांना समाजातील 'आहे रे' व 'नाही रे' यांच्यातील प्रचंड मोठ्या दरीने व्यथित केले. 'नाही रे' वर्गाच्या हक्कांसाठी व अधिकारांसाठी मग ते समाजकारणात उतरले! त्यासाठी अर्थातच त्यांनी समाजवादी विचारांचा मार्ग जवळ केला. १९५२च्या बिहार विधानसभा निवडणुकीत कर्पुरी ठाकूर समाजवादी पक्षाचे उमेदवार म्हणून निवडून आले. त्यावेळी त्यांनी कामगारांच्या, टपाल कर्मचा-यांच्या हक्कासाठी अनेक लढे उभे केले. या लढ्यात त्यांनी प्रदीर्घ उपोषणेही केली. १९५६ साली लोहियांनी त्यावेळच्या काँग्रेस सरकारविरुद्ध मोठे आंदोलन सुरू केले होते. समाजातील जातिभेद नष्ट केल्याशिवाय आर्थिक क्षेत्रात समानता येणार नाही, अशी भूमिका मांडून त्यांनी मागास जातींना न्याय मिळावा, अशी मागणी लावून धरली. बिहारमध्ये त्यावेळी शेतजमीन मोठ्या प्रमाणात राजपूत व भूमीहार यांच्या हाती एकवटलेली होती. सरकारी नोक-यांमध्ये कायस्थ जातीची एकाधिकारशाही निर्माण झालेली होती.

त्यामुळे लोहियांच्या या आंदोलनास बिहारमध्ये प्रचंड प्रतिसाद मिळाला. या आंदोलनात कर्पुरी ठाकूर यांनी स्वत:ला झोकून दिले होते. त्यातूनच एका नव्या नेत्याचा जन्म झाला. पुढे कर्पुरी ठाकूर यांनी ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुरांचे प्रश्न लावून धरले. कामगार चळवळीतही त्यांचा अत्यंत सक्रिय सहभाग राहिला. १९६० सालच्या केंद्रीय कर्मचा-यांच्या संपाला पाठिंबा दिला म्हणून त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. दक्षिण बिहारमधील टाटा स्टीलच्या कामगारांच्या १९७० सालच्या संपात उतरल्याने त्यांना शिक्षाही भोगावी लागली. त्यावेळी त्यांनी २८ दिवसांचे उपोषण केले होते. सरकारी कामकाज व शिक्षण यांचे माध्यम लोकभाषाच असली पाहिजे या भूमिकेतून लोहियांनी 'अंग्रेजी हटाव' ही चळवळ चालवली होती. १९७० साली बिहारमध्ये पहिले बिगर काँग्रेसी सरकार सत्तेवर आले. या सरकारमध्ये कर्पुरी ठाकूर उपमुख्यमंत्री होते. प्रशासनाचा कारभार हिंदीतूनच चालावा, असा आग्रह त्यांनी धरला आणि त्यावरूनच त्यांना मंत्रिपद सोडावे लागले. पुढे ते चरणसिंह यांच्या भारतीय क्रांती दलात सामील झाले. राज्यभर दौरे काढून त्यांनी मागास जातींना संघटित केले. १९७१ च्या भूमीमुक्ती आंदोलनात भाग घेऊन अनेक जिल्ह्यांत त्यांनी मागास जातीच्या शेतमजुरांना शेतजमिनी मिळवून दिल्या. कर्पुरी ठाकूर हे जयप्रकाश नारायण यांचे लाडके शिष्य होते. आणीबाणी व संपूर्ण क्रांती लढ्यात त्यांनी स्वत:ला झोकून दिले होते.

इंदिरा गांधी यांचा पराभव करून जनता पक्ष सत्तेवर आल्यावर बिहारमध्येही जनता पक्षाची सत्ता आली. कर्पुरी ठाकूर बिहारचे मुख्यमंत्री बनले. सरकारी नोक-यांमध्ये मागास जातींना आरक्षण असावे, असा अहवाल मुंगेरीलाल आयोगाने दिला होता. तो लागू करण्याचा निर्णय कर्पुरी ठाकूर यांनी घेतला. मात्र पक्षातील उच्चजातीय आमदारांनी त्याला विरोध केल्याने कर्पुरी ठाकूर यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. १९७९ साली जनता पक्ष फुटला तेव्हा त्यांनी चरणसिंह यांना साथ दिली. १९८०च्या निवडणुकीत जनता पक्ष सेक्युलरचे उमेदवार म्हणून ते निवडून आले व पुन्हा मुख्यमंत्री बनले. त्यांनी बिहारमध्ये संपूर्ण दारूबंदी केली. कर्पुरी ठाकूर यांचे वंचित, कामगार, शेतकरी, शेतमजूर, महिला या वर्गासाठीचे काम अमोघच होते. मात्र, त्यांचे मुख्यमंत्री म्हणून तयार केलेले आरक्षणाचे मॉडेल हे कधीही न विसरता येणारेच आहे. त्यांच्या या मॉडेलनुसार आरक्षणात ओबीसींना १२ टक्के, अतिमागासांना ८ टक्के, महिलांसाठी ३ टक्के आणि उच्च जातीतील आर्थिकदृष्ट्या मागासांसाठी तीन टक्के असे आरक्षण सरकारी नोक-यांत ठेवण्याची शिफारस होती. आरक्षण धोरणाचा असा सखोल व व्यापक विचार करणारा नेता म्हणून कर्पुरी ठाकूर देशाच्या कायमच स्मरणात राहतील.

अशा या नेत्यास त्यांच्या जन्मशताब्दी सांगतेच्या निमित्ताने भारतरत्न सन्मानाने गौरविले जाणे अत्यंत स्वागतार्हच! आता या सन्मानाच्या टायमिंगविषयी- सरकारचा युक्तिवाद असाच की, जन्मशताब्दी सांगतेचे निमित्त साधून हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. तांत्रिकदृष्ट्या हा युक्तिवाद बिनतोडच! मात्र, विद्यमान सरकारला लोकसभा निवडणुकीच्या तोंडावरच कायम विरोधकांच्या खेम्यातील गुणवानांची स्वपक्षीय विचारधारेच्या गुणवानांपेक्षा अतितीव्रतेने आठवण का होते? हा मात्र प्रश्नच! उदाहरणच द्यायचे तर २०१९ च्या निवडणुकीपूर्वी विद्यमान सत्ताधा-यांना त्यांच्यासाठी निवडणुकीच्या राजकारणातील निकड बनलेल्या पूर्व भारतातील प्रणव मुखर्जी व संगीतकार भूपेन हजारिका यांची तीव्रतेने आठवण होते. तशीच आठवण होऊन ज्यांना राज्यातील भाजप नेत्यांनी भ्रष्टाचाराचे प्रतीक ठरवले अशा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या महतीची खात्री पटून केंद्रातील भाजप सरकार मात्र त्यांना पद्मविभूषण सन्मानाने गौरवते.

ज्यांची भाजपने सतत 'मुल्ला मुलायम' अशा शब्दांत हेटाळणी केली त्यांना मरणोत्तर पद्मविभूषण जाहीर करून 'पापक्षालन' करण्याची उबळ भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला येते आणि आता बिहारमध्ये भाजपची साथ सोडून नितीशकुमार यांनी लालू प्रसाद यादव यांच्या पक्षाचा व काँग्रेसचा हात धरलेला असताना व जातगणनेची मागणी लावून धरलेली असताना त्यावरून अडचणीत सापडलेल्या विद्यमान भाजप नेतृत्वाला याच नितीशकुमार, लालू यांना घडविणा-या कर्पुरी ठाकूर यांच्या अमोघ कार्याचे स्मरण होते व त्यांना 'भारतरत्न'ने गौरवणे गरजेचे वाटते. एवढेच नाही तर स्वत: पंतप्रधानांना देशातील तमाम सर्वभाषिक वृत्तपत्रांमध्ये स्वत:च्या नावे कर्पुरी ठाकूर यांच्यावरील लेख प्रसिद्ध करून त्यांच्या महान कार्याची माहिती जनतेपर्यंत व्यापकपणे पोहोचविणे गरजेचे वाटते! कर्पुरी ठाकूर यांना भारतरत्न सन्मानाने गौरविण्याच्या विद्यमान सरकारच्या निर्णयाचे मनापासून स्वागत करतानाच या सन्मानाच्या टायमिंगबाबत विद्यमान सरकारचे कौतुक करावे की सन्मानाचा वापर राजकीय हित साधण्यासाठी करण्याच्या सत्ताधा-यांच्या मानसिकतेची निर्भत्सना करावी, हा प्रश्न नक्कीच उपस्थित होतो, हे मात्र निश्चित!

# न्याय यात्रेवर अन्याय!

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या 'भारत जोडो न्याय यात्रे'ला मंगळवारी गुवाहाटीत प्रवेश नाकारण्यात आला. शहरामध्ये वाहतुकीची कोंडी होईल असे कारण देत मुख्यमंत्री हिमांत बिस्वा सरमा यांनी ही परवानगी नाकारली. त्यानंतर काही वेळाने सरमा यांनी राज्याच्या पोलिस महासंचालकांना राहुल गांधी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. ही यात्रा गुवाहाटीच्या सीमेवर रोखल्यामुळे काँग्रेस कार्यकर्ते आणि पोलिस यांच्यात संघर्ष झाला. काँग्रेस कार्यकर्त्यांनी बॅरिकेड्स तोडून यात्रा पुढे नेण्याचा प्रयत्न केला. यात काही पोलिसांना इजा झाली. त्यामुळे पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. राहुल आसाममधील शांतताप्रिय जनतेला चिथावणी देत असल्याचा आरोप करत सरमा यांनी त्यांच्यावर 'नक्षलवादी डावपेच' लढवल्याची टीका केली.

या घडामोडीनंतर शहराच्या बाहेर कार्यकर्त्यांना संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, आपण बॅरिकेड तोडले आहेत पण आपण कायदा मोडणार नाही. भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा या मार्गाने जाऊ शकतात. पण आपल्याला मात्र अडवले जात आहे अशी टीकाही त्यांनी केली. आम्हाला दुर्बल समजू नका असा इशाराही त्यांनी दिला. आपल्या देशात लोकशाही आहे. हा देश संविधानाच्या आधारे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाने चालणारा आहे. देशात सत्ताधा-यांबरोबरच विरोधकांनाही तेवढेच महत्त्वाचे स्थान आहे. लोकशाहीवादी देशात कुणालाही आपल्या राजकीय विचारांचा प्रचार-प्रसार करण्याचा समान अधिकार आहे. या देशात विचारस्वातंत्र्य अभिव्यक्तीस्वातंत्र्य आहे. त्याच उद्देशाने राहुल गांधी यांनी या आधी 'भारत जोडो यात्रा' काढली होती. ही यात्रा कन्याकुमारीपासून सुरू होऊन ती १२ राज्यांमधून काश्मीरला पोहोचली होती. देशभरातील जनतेने या यात्रेचे ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत केले होते. 'भारत जोडो यात्रे'च्या अभूतपूर्व यशानंतर राहुल गांधी यांनी 'भारत न्याय यात्रा' सुरू केली आहे.

१४ जानेवारीपासून मणिपूरमधून या यात्रेस प्रारंभ झाला. ही यात्रा १४ राज्यांमधील ८५ जिल्ह्यांतून मजल-दरमजल करत २० मार्च २०२४ रोजी मुंबईत पोहोचणार आहे. सुमारे ६२०० कि.मी. अंतर राहुल गांधी वाहनाद्वारे तसेच काही अंतर चालत पूर्ण करणार आहेत. ही यात्रा देशातील जनतेला आर्थिक, सामाजिक व राजकीय न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आली आहे. या आधीच्या 'भारत जोडो यात्रे' दरम्यान राहुल गांधी यांनी आर्थिक विषमता, सामाजिक ध्रुवीकरण आणि राजकीय हुकूमशाही हे तीन मुद्दे उपस्थित केले होते. भारत न्याय यात्रा आसाममध्ये आली असता भाजपच्या कार्यकर्त्यांनी हुल्लडबाजी करून ती रोखण्याचा प्रयत्न केला तेव्हा राहुल गांधी यांनी मोठ्या संयमाने परिस्थिती हाताळली. त्यानंतर राहुल गांधी आसाममधील वैष्णव संत शंकरदेव मंदिरात पूर्व परवानगी घेऊन गेले, तिथेही त्यांना संत शंकरदेव यांचे दर्शन घेण्यापासून रोखण्यात आले. स्थानिक पोलिसांनी अडवल्यानंतर राहुल गांधी यांनी आपल्या समर्थकांसह तेथे ठिय्या मांडला.

स्थानिक खासदार-आमदारांना मठात जाण्याची परवानगी होती. परंतु राहुल गांधींना परवानगी देण्यात आली नाही. संधी मिळाल्यानंतर आपण पुन्हा या मंदिरात येऊ असे राहुल गांधींनी म्हटले आहे. मुळात राहुल गांधी यांची यात्रा रोखण्याचा प्रयत्न करणे, त्यांना मंदिरात प्रवेश करण्यापासून ताटकळत ठेवणे योग्य नाही. सत्ताधा-यांना आपल्या पक्षाचा प्रचार व प्रसार करण्याचा अधिकार आहे तसाच विरोधकांनाही आहे. मात्र, आपल्या राजकीय विरोधकांना सनदशीर मार्गाने प्रचारसुद्धा करू द्यायचा नाही, मंदिर प्रवेशासाठी आडकाठी करायची ही काही सुदृढ लोकशाहीची लक्षणे म्हणता येणार नाहीत. विरोधी पक्षमुक्त भारत, काँग्रेसमुक्त भारत या घोषणाच मुळी हुकूमशाहीचे समर्थन करणा-या आहेत. एकीकडे आपण लोकशाहीचे पाईक म्हणायचे आणि कृती मात्र हुकूशहाची करायची हा दुटप्पीपणाचा कहरच होय. टीव्हीवर केवळ आपलीच छबी दिसली पाहिजे हे काही समंजस व परिपक्व राज्यकर्त्यांचे लक्षण नव्हे. यातून केवळ राजकारणच डोकावत आहे.

गत दशकभरापासून धर्माधिष्ठित राजकारणाला खतपाणी घातले जात असल्याचे दिसून येत आहे. जनतेच्या धार्मिक भावनांना फुंकर घालून सत्तेची पायाभरणी भक्कम करण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक केले जात आहेत. ही कृती करत असताना देशाची राज्यघटना धाब्यावर बसवली जात आहे. धार्मिक भावना जागवून, चेतवून जनतेचे दैनंदिन जीवनातील प्रश्न झाकोळून टाकण्याचा राजमार्ग स्वीकारण्यात आल्याचे स्पष्ट दिसत आहे. सत्ताधारी पक्ष देशाला कुठे घेऊन चालला आहे याचे भान त्यांना नसले तरी सामान्य जनतेने ठेवणे आवश्यक आहे. हा देश लोकशाहीच्या माध्यमातून संविधानानुसार चालणारा आहे. इथे सर्वधर्म समभाव हे तत्त्व जोपासले जाते. केवळ एका धर्माचे राष्ट्र नसून सर्व धर्मांना समान न्याय देणारे राष्ट्र आहे. लोकशाहीत सत्ताधारी व विरोधक ही सत्तेची दोन चाके आहेत. भारतीय संविधानाने सर्वांना काही मूलभूत अधिकार बहाल केले असल्याने सर्वांना भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. त्याला अनुसरून राहुल गांधी जनतेची दुभंगलेली मने जोडण्यासाठी शांती, मानवता, संविधान, निर्भयता याबाबत जनतेला न्याय व दिलासा मिळवून देण्यासाठी भारत जोडो यात्रा,

न्याय यात्रा काढत पदभ्रमण करीत आहेत. राजकीय इप्सित साध्य करण्यासाठी एखादा राजकीय पक्ष यात्रा काढत असेल तर त्यात गैर काहीही नाही. तुम्हीसुद्धा रथयात्रा काढली होतीच की! परंतु सत्ताधारी पक्ष यात्रेला मिळत असलेला अभूतपूर्व प्रतिसाद पाहून त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते गैरच म्हटले पाहिजे. कायद्याचा बडगा उगारून विनाकारण यात्रा रोखणे, यात्रेत हुल्लडबाजी करून यात्रेला गालबोट लावण्याचा प्रयत्न करणे, धार्मिक द्वेष करत तेढ निर्माण करणे हे निषेधार्ह तसेच नव्या कालचक्रात शोभणारे नाही. धार्मिकतेचा इव्हेंट करून राज्य करता येत नाही. ही राजेशाही नसून लोकशाही आहे याचे भान ठेवणे आवश्यक आहे. सत्ताकारण करताना भाजप कुठल्याही थराला जाऊ शकतो हे अनेकवेळा सिद्ध झाले आहे. भाजपला विरोधकच नको आहेत. एक नेता-एक पक्ष-एक देश हीच त्यांची अंतिम इच्छा आहे. कसेही करून यात्रेला खोडा घालायचा हेच अंतिम ध्येय!

**printed by ASHWINI SHRIKANT DAROLE, and published by ASHWINI SHRIKANT DAROLE, Owner by ASHWINI SHRIKANT DAROLE on behalf of Marathi Weekly NIRBHID VARTMAAN, printed at Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shaniwar Peth, Pune - 411030 (Maharashtra)** Publish at - **Flat No. 607, Faluni Bldg, Near Icici Bank, NDA Road Near, Uttam Nagar, Shivne, Pune City, Pune - 411023 (Maharashtra)** Editor - **ASHWINI SHRIKANT DAROLE**

मुद्रक अश्विनी श्रीकांत दारोळे, आणि प्रकाशक अश्विनी श्रीकांत दारोळे, मालक अश्विनी श्रीकांत दारोळे, यांचे नावे मराठी साप्ताहिक निर्भीड वर्तमान, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या शेजारी, ५३५ शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : फ्लॅट नं. ६०७, फाल्गुनी बिल्डींग, आयसीआयसीआय बँकेशेजारी, एनडीए रोड, उत्तम नगर, शिवणे, पुणे शहर, पुणे – ४११०२३ महाराष्ट्र. संपादक : अश्विनी श्रीकांत दारोळे (अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या लेख व जाहिरात यांचेशी मालक, संपादक सहमत असतीलच असे नाही– सदरचे वाद विवाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)

# स्वारगेट पोलीसांनी प्रवाशांचे दागिणे चोरी करणाऱ्या चोरास काही तासात केले जेरबंद

निर्भीड वर्तमान:- स्वारगेट एस.टी. स्टॅन्ड येथे बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेवुन अज्ञात चोरटयाने तक्रारदार शिंदे यांच्या गळ्यातील १७ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन चोरी केली होती. त्यावरुन शिंदे यांनी फिर्याद दिल्यावरुन गुन्हा दाखल करण्यात करून तात्काळ स्वारगेट पोलीस स्टेशनचे तपास पथक यांनीअज्ञात आरोपीचा शोध सुरू केला होता.

स्वारगेट एस.टी. स्टॅन्ड

स्वारगेट पोलीस स्टेशन कडील तपासपथकाचे प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक प्रशांत संदे तसेच तपास पथकातील अंमलदार पोशि कांबळे व पोशि शेख यांनी स्वारगेट एसटी स्टॅन्ड येथे जावुन तेथिल सीसीटीव्ही फुटेज चेक करुन त्या आरोपीचा शोध घेत असतांना, स्वारगेट एस.टी. स्टँड येथे आरोपी संतोष रामकृष्ण शंकपाळ हा संशयीत्या फिरत असताना पोलिसांना दिसला पोलिस त्याचे दिशेने जाताच तो पळुन जावु लागल्याने पोलीसांनी शिताफीने त्याचा पाठलाग करुन त्याला घेराव घालुन आरोपी संतोष शंकपाळ याला ताब्यात घेतले आणी पळुन जाण्याचे कारण विचारता तो उडवाउडवीची उत्तरे देवु लागल्याने त्याची अंगझडती घेतली तर त्याचे पॅन्टच्या खिशात एक अर्धवट तुटलेली सोन्याची चैन मिळुन आली म्हणुन त्यास पोलीस ठाणेस आणुन त्यानंतर त्याचेकडे कसुन चौकशी केलयानंतर त्याने चेन स्वारगेट एस.टी. स्टॅन्ड येथेच चोरी




केल्याचे कबुल केले.

अश्याप्रकारे पोलिसांच्या तात्काळ कारवाई मुळे स्वारगेट एस.टी. स्टॅन्ड प्रवाशांची गर्दीचा फायदा घेऊन चोरी करणार चोर काही तासात जेरबंद करण्यात स्वारगेट पोलीस स्टेशनचे तपास पथकाला यश आले आहे.

सदरची कामगिरी ही मा. श्री. प्रविणकुमार पाटील सो, अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर. मा.श्री. स्मार्तना पाटील सो, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर. मा. श्रीमती नंदिनी वग्यानी सो, सहा. पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली स्वारगेट पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. निरीक्षक श्री सुरेशसिंग गौड, श्रीमती संगीता पाटील पोलीस निरीक्षक (गुन्हे), यांच्या आदेशान्वये तपास पथकातील सहा. पोलीस निरीक्षक श्री.प्रशांत संदे, पोलीस उप- निरीक्षक प्रतापसिंह शेळके, पो. हवा. विजय कुंभार, पो.हवा. मुंढे, पो.ना. देवकाते, सोमनाथ कांबळे, सुजय पवार, शिवा गायकवाड, अनिस शेख, फिरोज शेख, रमेश चव्हाण, संदीप घुले, अनिस शेख, प्रविण गोडसे, दिपक खंदाड, संजय मस्के, यांनी एकत्रमिळुनकेलीआहे.

# सेवानिवृत्त पोलिसांचा औषधांचा प्रश्न मार्गी लावण्याची राज्य सरकारकडे मागणी

**निर्भीड वर्तमान :-** महाराष्ट्र पोलीस दलातील कर्मचारी - अधिकारी सेवेत असताना दिवस-रात्र जीव धोक्यात घालून कर्तव्य बजावतात. पोलीस अधिकारी कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर अनेक विविध आजारांनी ग्रासले जातात. अशावेळी दर महिन्याला लागणाऱ्या औषधांचा खर्च काही हजारो रुपयांचा आहे. सेवानिवृत्त पोलिसांना त्यांच्या कुटुंबीयांसाठी होणारा औषधांचा खर्च अजिबात परवडणारा नाही. पोलिसांना लागणारी औषधे राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने द्यावीत, अशी मागणी पुणे निवासी जिल्हाधिकाऱ्यांकडे मा. सहा पोलीस आयुक्त तथा ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष मिलिंद गायकवाड यांनी केली आहे.




यावेळी रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण, मा. सहा. पोलीस आयुक्त संगीता पाटील, मा. सहा. पोलीस आयुक्त जान महंमद पठाण, रुग्ण हक्क परिषदेचे पुणे शहर अध्यक्ष रवींद्र चव्हाण, ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनचे संचालक राजाभाऊ कदम, अपर्णा मारणे साठ्ये यावेळी प्रमुख उपस्थित होते.

रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यावेळी म्हणाले की, कोविडच्या काळात राज्य सरकारचे सन २०२०-२१ यावर्षी औषध खरेदीचे बजेट दोन हजार कोटी रुपये होते. यंदाच्या वर्षी राज्य सरकारच्या औषध खरेदीचे बजेट ६९५ कोटी रुपयांचे आहे. तब्बल ६९५ कोटी रुपयांची औषधे राज्य सरकार दरवर्षी खरेदी करते तरीही हजारोंच्या संख्येने खाजगी मेडिकल दुकाने दरवर्षी कोट्यावधी रुपयांचा व्यवसाय करतात. राज्य सरकारने खरेदी केलेली औषध जातात कुठे? असा सवाल उपस्थित करतानाच निवृत्त पोलिसांना केवळ २० कोटी रुपयांची दरवर्षाला औषध दिली तरीसुद्धा संबंधित गंभीर प्रश्न तात्काळ मार्गी लागेल. राज्याचे मुख्यमंत्री आणि आरोग्य मंत्री यांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे आणि तात्काळ औषधांच्या मागणीप्रमाणे निवृत्त पोलिसांना औषधांचा पुरवठा करावा, अशी मागणी शिष्टमंडळाकडून करण्यात आली आहे.

# नंदुरबारच्या आदित्य ब्राह्मणेला मरणोत्तर प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान

**निर्भीड वर्तमान:-** महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्याच्या आदित्य ब्राह्मणेला मरणोत्तर प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. विज्ञान भवनात केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाने पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला होता.

आदित्य याने आपल्या चुलत भावाचा जीव वाचवण्यासाठी आपला प्राण गमावला. आदित्यला राष्ट्रपती यांच्या हस्ते शौर्य श्रेणीतील पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. आदित्यच्या लहान भावाने, आरुषने हा पुरस्कार स्वीकारला.

### आदित्य ब्राह्मणे

आदित्य आणि त्याचा चुलत भाऊ नदीच्या किनाऱ्याजवळ खेळत होते. खेळताना त्याचा चुलत भाऊ बुडू लागला. हे पाहून आदित्यने धोका असतानाही खोल पाण्यात उतरून आपल्या चुलत भावाला वाचवण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने, आदित्य खूप खोल गेला, आदित्यचा प्रयत्न व्यर्थ गेला आणि त्याचा बुडून मृत्यू झाला. मात्र, कठीण प्रसंगात आपले अतुलनीय शौर्य दाखविले. त्याच्या या शौर्यपूर्ण प्रयत्नाबद्दल त्याला मरणोत्तर शौर्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार (पीएमआरबीपी)' असामान्य क्षमता आणि



अतुलनीय कामगिरी करणाऱ्या मुलांना दिला जातो. शौर्य, कला आणि संस्कृती, पर्यावरण, नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, समाजसेवा आणि क्रीडा या श्रेणींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ५ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांना हे पुरस्कार प्रदान झाले. प्रत्येक पुरस्कारार्थीला पदक, प्रमाणपत्र आणि प्रशस्तिपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

यंदाच्या प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी देशातील १८ जिल्ह्यांमधून असामान्य कामगिरी करणाऱ्या १९ मुलांची निवड करण्यात आली होती. २६ जानेवारी, २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पथ संचलनातही ही मुले सहभागी होणार आहेत.

निवड झालेल्या मुलांच्या यादीमध्ये शौर्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या श्रेणींमध्ये प्रत्येकी एका मुलाचा तर समाजसेवेच्या श्रेणीत चार मुलांचा; क्रीडा प्रकारात पाच आणि कला आणि संस्कृती श्रेणीत सात मुलांचा समावेश होता. या यादीत १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील ९ मुले आणि १० मुलींचा समावेश होता.

# १० लाख रुपये पर्यंत वैयक्तिक कर्ज; दोन महामंडळे सुरू गरजूंना योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

निर्भीड वर्तमान:-महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांतर्गत जगदज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ व संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित झालेले आहे. या महामडळांमार्फत राज्यातील गुरव व लिंगायत समाजातील घटकांसाठी व्यापार, उद्योग, शेतीपूरक व्यवसाय तसेच व्यावसायिक व उच्च शिक्षणासाठी विविध कर्ज योजना उपलब्ध आहेत. या महामंडळाच्या योजनांचा लाभ जास्तीत जास्त गुरव व लिंगायत समाजाच्या लाभार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन महामंडळा तर्फे करण्यात आले आहे.

### कर्ज योजनांची माहिती खालीलप्रमाणे

### संत काशिबा गुरव महामंडळ

ऑनलाईन कर्ज योजना-राष्ट्रीयकृत, नागरी,सहकारी,शेड्यूल्ड- मल्टिशेड्यूल्ड बँकांकडून घेतलेल्या कर्जाच्या दरमहा नियमित परतफेड केलेल्या हप्त्यावरील




१२ टक्क्ये पर्यंतच्या व्याजाच्या व ५ वर्ष पर्यंतच्या मुदत कर्जावरील व्याज रकमेचा परतावा लाभार्थ्यास ऑनलाइन पद्धतीने बचत खात्यात महामंडळातर्फे जमा करण्यात येईल. लाभार्थ्यांनी बँकेकडे कर्जासाठी अर्ज करण्यापूर्वी महामंडळाचे पात्रता प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. ऑनलाइन कर्ज योजनांसाठी अर्ज महामंडळाच्याwww. msobcfdc.org या वेबसाइटवर अर्ज करावा.

- **१) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना-व्यापार उद्योग,सेवा व शेतीपूरक व्यवसायासाठी लागणारे कर्ज, कर्ज मर्यादा १० लाख रुपये पर्यंत, अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत.**
- **२) गटकर्ज व्याज परतावा योजना-बचत गट,भागीदारी संस्था (निबंधक मुंबई प्राधिकृत),सहकारी संस्था (जिल्हा उपनिबंधक प्राधिकृत)इ. कर्ज मर्यादा १० ते ५० लाख रुपये,गटातील सभासदांची वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपये पर्यंत.**
- **३) शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना- पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी कर्ज,देशांतर्गत शिक्षणासाठी १० लाख रुपये,विदेशात शिक्षणासाठी २० लाख रुपये. (अभ्यासक्रम- आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायिक-व्यवस्थापन, कृषी, अन्न प्रक्रिया व पशु विज्ञान.) अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपये पर्यंत.**
- **४)महिला स्वयंसिद्धी कर्ज व्याज परतावा योजना- महिला बचतगटांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लोकसंचालित साधन केंद्राच्या सहाय्याने राबविण्यात येईल. प्रथम टप्प्यात ५ लाख रुपयांचे कर्ज घेण्यास मान्यता व कर्ज परतफेडीनंतर द्वितीय टप्प्यांत १० लाख रुपये कर्ज घेण्यास पात्र.**

### महात्मा बसवेश्वर महामंडळ

### ऑफलाईन कर्ज योजना

थेट कर्ज योजना- १ लाख रुपये कर्ज महामंडळामार्फत,नियमित कर्ज परतफेडीवर व्याज आकारले जाणार नाही. थकित कर्जावर ४ टक्के व्याज आकारले जाईल. कर्ज परतफेड कालावधी ४ वर्षे (२०८५ रुपये मासिक हप्ता),अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा १ लाख रुपयापर्यंत.

२)बीज भांडवल कर्ज योजना- राष्ट्रीयकृत व जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत राबविण्यात येईल. कर्जमर्यादा ५ लाख रुपये,बँक मंजूर कर्ज रकमेत महामंडळ सहभाग २० टक्के व बँकेचा सहभाग ७५ टक्के व लाभार्थ्याचा सहभाग ५ टक्के असेल. व्याजदर महामंडळ सहभागावर ६ टक्के बँकेच्या सहभागावर प्रचलित बँक व्याजदरानुसार,अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा १ लाख रुपये पर्यंत.

पात्रतेचे निकषः-लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व इतर मागासवर्गीय असावा. महामंडळ,बँक अथवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा,कुटुंबातील एकाच व्यक्तीस लाभ घेता येईल. वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे,निवडलेल्या व्यवसायाचे ज्ञान,अनुभव असणे आवश्यक,कर्जाच्या अटी शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे असतील. सर्व व्याज परतावा योजनांसाठी लाभार्थ्याने कर्ज मंजुरीसाठी बँकेकडे जाण्यापूर्वी महामंडळाचे पात्रता प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

गुरव व लिंगायत समाजाच्या बांधवांनी योजनांची अधिक माहिती, ऑफलाइन कर्ज योजनांच्या अर्जासाठी शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, खोली क्रमांक ३३, तळमजला, कलानगर वांद्रे (पूर्व) जिल्हा मुंबई. दूरध्वनी क्रमांक (०२२) २२३५५९७५४१ येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अनुसूचित जातप्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी मोबदल्यात मागितली लाच; महसूल सहाय्यक ACBच्या ताब्यात




निर्भीड वर्तमान:- अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी उपविभागीय कार्यालय माजलगाव येथे मागितले जातात १ प्रमाणपत्रासाठी २००००/- रुपये उपविभागीय कार्यालय, माजलगाव महसुल सहाय्यकाने लाच मागणी केल्याचा प्रकार उघड झाला आहे.

**काय आहे संपूर्ण प्रकरण;**

कुटुंबातील ६ व्यक्तींचे राजगौंड जातीचे अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र मिळणे करीता प्रकरणातील तक्रारदार यांनी सेवासेतु केंद्राद्वारे तहसिल कार्यालय धारुर येथे ऑनलाईन पध्दतीने प्रकरणे दाखल केली होती. तहसिल कार्यालयाची कारवाई होऊन तक्रारदार यांचे सर्व प्रकरणे उपविभागीय कार्यालय माजलगाव येथे दाखल केले. या प्रकरणात यातील आरोपी लोकसेवक श्री. जाधव यांनी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांचेकडुन सर्व प्रकरणांचे जात प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी मोबदला म्हणुन प्रत्येक प्रमाणपत्रासाठी २००००/- रुपये प्रमाणे सहा प्रमाणपत्रांचे १२००००/- रुपयांची मागणी करत होते.

तक्रारदार यांना लांच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तक्रार दाखल केली.

मिळालेल्या तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचे अधिकारी यांनी दिनांक २४/०१/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक श्री. जाधव यांनी पंचासमक्ष ५००००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोअंती ४००००/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले होते. तर नंतर सापळा लावला असता आरोपी जाधव यांनी तडजोडीअंती मान्य केलेली रक्कम ४००००/- पैकी ३००००/- रुपये पंचासमक्ष खाजगी व्यक्ति आरोपी शेख असेफ यांनी लोकसेवक वैभव जाधव यांच्या सांगनेवरुन लाच रक्कम ३००००/- लागलीच स्विकारतांना त्याला रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्यानुसार श्री. वैभव बाबुराव जाधव वय ४४ वर्ष महसुल सहायक नेमणुक उपविभागीय कार्यालय, माजलगाव वर्ग-३ व २) श्री. शेख आसेफ अहमद वय २४ वर्ष यांना पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन ३००००/-रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारल्या वरुन या दोघान विरुध्द पोलीस ठाणे माजलगाव शहर जिल्हा बीड येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा. संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर, श्री. राजीव तळेकर, प्रभारी अपर पोलीस प्रवि छत्रपती संभाजी नगर, यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, बीड व पोलीस अंमलदार यांनी कारवाई केली आहे.

## पंजाबच्या रुरल ऑलिम्पिक प्रमाणे राज्याचा पारंपरिक क्रीडा महोत्सव दरवर्षी व्हावा - राज्यपाल रमेश बैस

**मुंबई :** पंजाबमध्ये होत असलेल्या 'किला रायपूर खेल महोत्सव' अर्थात रुरल ऑलिम्पिक प्रमाणे महाराष्ट्रातील कबड्डी, खोखो, दांडपट्टा आदी पारंपरिक क्रीडा प्रकारांचा समावेश असलेला क्रीडा महाकुंभ दरवर्षी भरवला जावा, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त यंदा प्रथमच आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ' या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २६) राज्यपाल बैस यांच्या



उपस्थितीत जांबोरी मैदान, मुंबई येथे पार पडले, त्यावेळी ते बोलत होते. महाकुंभाच्या उद्घाटनाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई महानगर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी, मुंबई व उपनगर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, क्रीडा भारतीचे गणेश देवरुखकर तसेच मोठ्या संख्येने पारंपरिक क्रीडाप्रेमी उपस्थित होते. महाराष्ट्राला पारंपरिक खेळांची मोठी परंपरा आहे. छत्रपती शिवाजी महाराज स्वतः तलवारबाजी, घोडेस्वारी, भालाफेक व इतर क्रीडा प्रकारांमध्ये निपुण होते. छत्रपती शाहू महाराजांनी कुस्तीला चालना दिली. महाराष्ट्राच्या खाशाबा जाधव यांनी देशाला पहिले ऑलिम्पिक पदक मिळवून दिले असे सांगून पारंपरिक क्रीडा प्रकारांसाठी स्वतंत्र महोत्सव सुरु केल्याबद्दल राज्यपालांनी राज्य शासन, महानगर पालिका व क्रीडा भारतीचे अभिनंदन केले. आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करताना मातृभाषा व मातृभूमी यांसह स्वदेशी खेळांना प्रोत्साहन द्यावे लागेल असे सांगून, कुलपती या नात्याने राज्यातील विद्यापीठांना पारंपरिक खेळांना चालना देण्याची आपण सूचना करु, असे राज्यपालांनी सांगितले. लहानांपासून मोठ्यांपर्यंत लोक मोबाईल फोनचा अति वापर करताना दिसतात. समाजात मादक पदार्थांचा विळखा वाढत आहे. अशावेळी युवकांना पारंपरिक तसेच आधुनिक खेळांकडे प्रयत्नपूर्वक वळवले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

## अंगणवाडी सेविकांचा संप मागे: महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या शिष्टाईला यश

**मुंबई :** अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या विविध मागण्यासंदर्भात अनेक दिवसांपासून संप सुरू होता. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या विविध संघटनेचे शिष्टमंडळ आणि प्रतिनिधी यांच्या सोबत महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी वारंवार अनेक बैठका घेऊन यावर तोडगा काढला. अंगणवाडी सेविकांचा संप मिटविण्यासाठी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या शिष्टाईला अखेर यश आले.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे,महिला व बालविकास सचिव,अनुपकुमार, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्त रुबल अग्रवाल यांच्यासोबत वारंवार झालेल्या बैठकीत समाधानकारक आणि आशादायी चर्चा झाली. त्यामुळे आम्ही संप मागे घेत असल्याचे सर्व संघटनांनी जाहीर केले.

दरम्यान झालेल्या बैठकीत अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना पेन्शन लागू करण्याकरिता संघटनांकडून अभिप्राय घ्यावेत. सदर अभिप्राय व बँकांकडून प्राप्त होणारे प्रस्ताव यांचा एकत्रित अभ्यास करून एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्त यांनी तातडीने प्रस्ताव सादर करून वित्त व नियोजन विभागाकडे पाठवावा. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युएटी देण्याबाबत एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्याकडून प्राप्त प्रस्तावावर वित्त व न्याय विभागाचा अभिप्राय घेऊन वित्त व नियोजन विभागाकडे पाठविण्यात यावा, असे निर्देश मंत्री कु. तटकरे यांनी दिले. या आवाहनाला साद देत संपात सहभागी आसलेल्या सर्व संघटनांनी संप मागे घेत असल्याचे जाहीर केले. त्याबद्दल मंत्री कु. तटकरे यांनी सर्वांचे आभार मानले.

## मुंबईत चैतन्य आणि जिवंतपणा जाणवला

**मुंबई :** भारताच्या प्रजासत्ताक दिनी मुंबईतल्या वातावरणातला जिवंतपणा, चैतन्य आणि विशेषतः तरुणांचा उत्साह याचा अनुभव घेतल्याने मी खरोखरच प्रभावित झालो आहे, अशा शब्दांत संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेचे अध्यक्ष डेनिस फ्रान्सिस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत आज झालेल्या चर्चेत आपल्या भावना व्यक्त केल्या. मुंबईत ज्या झपाट्याने पायाभूत सुविधा, गृहनिर्माण विकास सुरु आहे तो देखील चकित करणारा आहे असे ते म्हणाले. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्यासमवेत वर्षा शासकीय निवासस्थानी संयुक्त राष्ट्र अधिकारी व प्रतिनिधींच्या शिष्टमंडळासमवेत आज दुपारी बैठक झाली. प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी डेनिस फ्रान्सिस यांना गणपती आणि छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती तसेच पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. या बैठकीस संयुक्त राष्ट्रातील भारताच्या स्थायी प्रतिनिधी राजदूत रुचिरा कंभोज, स्टीव्हन फिलिप, कैशा मॅकग्वेरे, स्नेहा दुबे, स्टीव्हन फिलिप, शॉम्बी शार्प, हम्मा मरियम खान उपस्थित होते. तर राज्य शासनातर्फे मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, राजशिष्टाचार विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर पाटणकर, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, परराष्ट्र मंत्रालयाचे राजेश गावंडे, मनपा अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे हे देखील बैठकीत सहभागी झाले होते.

## निवडणूक गीत मतदारांना प्रेरित करेल - मुख्य निवडणूक आयुक्त श्रीकांत देशपांडे

**मुंबई :** राज्यातील मतदारांना 'ये पुढे मतदान कर' असे आवाहन करणाऱ्या महाराष्ट्राच्या पहिल्या निवडणूक गीताचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आले. हे गीत राज्यातील मतदारांना आपला मताधिकार बजावण्यासाठी प्रेरित करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आज मुंबईतील जयहिंद महाविद्यालात झालेल्या कार्यक्रमात या गीताचे आणि त्याच्या ध्वनीचित्रफितीचे प्रकाशन झाले. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने 'स्वीप' उपक्रमाअंतर्गत या गीताची निर्मिती केली आहे. गीतकार स्वानंद किरकिरे अध्यक्षस्थानी होते. अभिनेते सुबोध भावे, संगीतकार मिलिंद इंगळे, गायक राहुल सक्सेना, गायिका वैशाली माडे, रॅपर जे. सुबोध आणि कस्तुरी आफळे उपस्थित होते.

२५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. यानिमित्त सन २०११ पासून हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. तरुण मतदारांना प्रोत्साहित करून त्यांचा सत्कार करून आणि मतदार नोंदणी वाढवून निवडणुकीत लोकांचा सहभाग वाढवणे हा या दिवसाचा उद्देश आहे. याचा उपयोग मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि निवडणूक प्रक्रियेत माहितीपूर्ण सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी देखील केला जातो. हा दिवस राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, मतदारसंघ आणि मतदान केंद्रस्तरावर साजरा केला जातो, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य हे देशातील लोकशाही व्यवस्थेमुळेच आहे. ते टिकावे यासाठी मतदारांनी आपला मताधिकार बजावून या स्वातंत्र्याचे रक्षण करायला हवे, असे आवाहन श्री. किरकिरे यांनी केले.

## प्रजासत्ताक दिनी कृषी विभागाच्या लक्षवेधी चित्ररथाचे सादरीकरण

**मुंबई :** प्रजासत्ताक दिनी शिवाजी पार्क येथील संचलनात कृषी विभागाच्या 'प्रति थेंब अधिक पिक' आणि 'कृषी क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर' ही चित्ररथाची संकल्पना होती.

राज्य व केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत - 'प्रति थेंब अधिक पिक' यामध्ये ठिबक व तुषार सिंचन संच बसविण्यासाठी सर्वसाधारण शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान व अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतकरी तसेच महिला शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदान देण्यात येते. पिकांच्या मुळाशी मर्यादित पाणी दिल्याने पिकांची जोमाने वाढ होऊन दर्जेदार उत्पादन मिळते. पिकांच्या मुळाच्या भोवती पाणी, माती व हवा यांचा समन्वय साधला जातो. पाण्याच्या कार्यक्षम वापर होऊन जास्तीस जास्त क्षेत्र सिंचनाखाली येते.

कृषी क्षेत्रामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब यामध्ये पिक आरोग्याची अचूक माहिती, उत्पादन तंत्रज्ञान, एकूण पिकांची उत्पादकता, बाजारपेठेतील विविध दरांची माहिती, पीक संरक्षणासाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर, आर्टिफिशियल इंटेलिजिएन्स तंत्रज्ञानाचा वापर, पीक कापणी प्रयोगाद्वारे अचूक उत्पादकता, विविध पीक विमा योजना तसेच योजना अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता व सुसूत्रतेसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे विविध योजनांचा थेट शेतकऱ्यांना लाभ, पीक पेरा (ई - पिक पाहणी) योजना इत्यादी योजनांचे संकल्पना या चित्ररथाद्वारे मांडण्यात आली होती.

## बंजारा समाजाच्या उन्नतीसाठी शासन कटिबद्ध - मंत्री गिरीश महाजन

**मुंबई :** राज्यांत मोठ्या प्रमाणात असलेला बंजारा समाज भटक्या विमुक्त जमाती मध्ये असून या समाजाला विकासाच्या दृष्टीने नाविन्यपूर्ण योजना राबवून उन्नतीसाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आज सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

यावेळी माजी खासदार हरिभाऊ राठोड, आमदार राजेश राठोड, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले,बंजारा समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष, शंकर पवार, गोद्री कुंभ प्रमुख, राज्य धर्मादाय समिती प्रमुख रामेश्वर नाईक, अरूण चव्हाण, संत गोपाल चैतन्य बाबाजी पाल, कबीर दास महाराज, श्याम चैतन्य महाराज, सुंदर महाजन, दिनेश चव्हाण उपसचिव इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, श्रीकृष्ण पवार उपसचिव,सहकार, पणन, पंडित जाधव उपसचिव ग्रामविकास आदी सह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी गोद्री येथील कुंभ मेळव्यास वर्षपूर्ती झाल्याच्या निमित्तने समाजातील वेगवेगळ्या समस्यांबाबतीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

## मुंबईकरांचा होणारा सत्कार अभिमानाची गोष्ट - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** मुंबई शहराच्या सर्व अद्वितीय गुणांचं दर्शन 'मुंबई फेस्टिव्हल २०२४' च्या निमित्ताने घडेल. मुंबईकरांमध्ये जगण्याचे 'स्पिरीट' निर्माण करणाऱ्या सर्वसामान्य मुंबईकरांचा होणारा सत्कार सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्य शासनाचा पर्यटन विभाग आणि मुंबई फेस्टिव्हल समिती मार्फत मुंबईमध्ये २० ते २८ जानेवारी दरम्यान 'मुंबई फेस्टिव्हल २०२४' आयोजित केला आहे आहे. या महोत्सवामध्ये गेट वे ऑफ इंडिया येथे 'मुंबई वॉक' या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी पर्यटन मंत्री गिरीश महाजन, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर,मुंबई फेस्टिवल सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा उद्योगपती आनंद महिंद्रा, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, पर्यटन सचिव जयश्री भोज,पर्यटन संचालक डॉ.बी.एन.पाटील हे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, मुंबई काळासोबत धावणारे शहर आहे. प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडवणारे कोळीवाडे, ऐतिहासिक किल्ले, जुनी चाळसंस्कृती, ब्रिटिशकालीन इमारतींचे वास्तूवैभव, सर्वांची स्वप्ने पूर्ण करणारे, जीवाला जीव देणाऱ्यांचे हे शहर आहे. मुंबईच्या हवेत संकटांशी लढण्याचे सामर्थ्य आहे. मुंबईकरांमध्ये जगण्याचे 'स्पिरीट' आहे. सर्वसामान्य नागरिक, माथाडी कामगार, डब्बेवाले, उद्योजक ते सिने तारे - तारका असे सर्वांचे शहर आहे.

मुंबई पोलीस आयुक्त श्री. फणसळकर म्हणाले की, पोलिस दल २४ तास सेवेत असते. जबाबदारी सोबतच हे काम करणे म्हणजे भाग्याचे आहे. 'मुंबई वॉक' हे मुंबई फेस्टिव्हलच्या वैशिष्ट्यांपैकी एक आहे. या वॉकद्वारे मुंबईची गती कायम ठेवणारे खरे हिरो डबेवाला, पोलिस हवालदार, बेस्ट बस चालक आणि वाहक तसेच सफाई कामगार, सफाई कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. गायक अवधुत गुप्ते, अमृता फडणवीस यांचा संगीताचा कार्यक्रम पार पडला. इंडियन पोलीस फोर्स या वेब सिरीज चे प्रमोशन अभिनेता विवेक ओबेरॉय, सिद्धार्थ मल्होत्रा,अभिनेत्री शिल्पा शेट्टी यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला अभिनेता समीर कोचर, पर्यटन विभागाच्या सदिच्छा दूत नवेली देशमुख, अभिनेता चंकी पांडे, कबीर बेदी, चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टी, अभिनेते पंकज त्रिपाठी, सुप्रसिद्ध शेफ संजीव कुमार या सर्वांनी 'मुंबई वॉक' मध्ये सहभाग घेतला.